**पोलीस उप आयुक्त, गुन्हे, पिंपरी चिंचवड**
पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड,
प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे

**प्रेसनोट दिनांक १६/०५/२०२४**

## दरोडा विरोधी पथकाकडुन किं.रूपये १०,१४,७००/- चे वेगवेगळया कंपन्यांचे ७० स्मार्ट मोबाईल फोन हस्तगत

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयात सन २०२३ व माहे मार्च २०२४ या दरम्यान बरेच मोबाईल फोन गहाळ झालेबाबत तक्रारी दाखल होत्या. त्याबाबत मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड यांनी गुन्हे शाखेकडील पथक व युनिट यांना हरविलेल्या मोबाईल फोनचा शोध घेवुन हस्तगत करणेकरीता विशेष मोहिम राबविणेबाबत आदेश देण्यात आले होते. त्या अनुषंगाने श्री. संदीप डोईफोडे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पिंपरी चिंचवड व श्री बाळासाहेब कोपनर, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे १, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली दरोडा विरोधी पथकचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री बाळकृष्ण सावंत यांनी अधिकारी व अंमलदार यांचे एक पथक तयार केले. सदर पथकास पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयामध्ये गहाळ झालेल्या मोबाईल बाबतच्या तक्रारींची माहिती संकलित करून, पो.अं. प्रविण कांबळे यांच्याकडे देणेबाबत सांगितले. पो.अं. कांबळे यांनी नमुद मोबाईल फोनबाबत तांत्रिक विश्लेषन विभागाचे पो.अं. माळी व हुलगे यांचेकडुन अद्यावत माहिती प्राप्त केली. त्याचा तांत्रिक दृष्ठया तपास करून, गहाळ झालेले जे मोबाईल फोन ॲक्टिव्ह झालेले आहेत त्याची माहिती संकलीत केली.

तदनंतर दरोडा विरोधी पथकातील अंमलदार यांना ॲक्टिव्ह झालेल्या मोबाईल क्रमांचे नाव व पत्ते देण्यात आले. पथकातील अंमलदार यांनी ॲक्टिव्ह झालेले कि.रू. १०,१४,७००/- चे ७० स्मार्ट मोबाईल फोन हे अमरावती, कोल्हापुर, अहमदनगर, नाशिक, बीड, जालना, औरंगाबाद, धाराशिव, सोलापुर इत्यादी जिल्हयातुन हस्तगत करण्यात आले आहेत. सदर स्मार्ट मोबाईल फोन मध्ये आयफोन, वन पल्स, विवो, मोटोरोला, सॅमसंग, रेड मी, नोकिया इत्यादी कंपन्यांचे मोबाईल फोन जमा केले आहेत. दरोडा विरोधी पथकाने मिळुन आलेले ७० स्मार्ट मोबाईल फोन हे त्यांचे मुळ मालकांना वरिष्ठांचे मार्फतीने प्रदान करण्याकरीता कार्यक्रमाचे नियोजन केले आहे.

सदर उल्लेखनीय कामगिरी ही मा. पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे सो, पिंपरी चिंचवड, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त सो, मा. संदीप डोईफोडे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, मा. श्री बाळासाहेब कोपनर, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे १, यांच्या मार्गदर्शनाखाली दरोडा विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण सावंत, सायबर सेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैभव शिंगारे, सहायक पोलीस निरीक्षक सागर पानमंद, पोलीस उप निरीक्षक भरत गोसावी, पोलीस अंमलदार प्रविण कांबळे, महेश खांडे, औदुंबर रोंगे, उमेश पुलगम, विक्रांत गायकवाड, गणेश हिंगे, आशिष बनकर, राहुल खारगे, नितीन लोखंडे, प्रविण माने, सागर शेडगे, गणेश कोकणे, गणेश सावंत, सुमित देवकर, विनोद वीर, अमर कदम, समीर रासकर, चिंतामण सुपे तसेच तांत्रिक विश्लेषण विभागातील पोहवा माळी व पोशि हुलगे यांनी केली आहे.

**(संदीप डोईफोडे)**
पोलीस उप आयुक्त (गुन्हे)
पिंपरी चिंचवड.